# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १७/०३/२०२२ (गुरूवार)

..........................................................................

## ०७ वर्षापासुन अफरातफरीच्या गुन्हयातील फरार आरोपी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नोव्हेंबर २०१५ मध्ये फिर्यादी प्रणय दिवाकर पाटणे रा. नरेंद्र नगर नागपूर यांचे कडे काम करणारा भगवान रमेश महल्ले रा. नेरी मानकर पो. स्टे. हिंगणा यांने फिर्यादीचे पाटणे ले—आउट, फेटरी येथील हॉस्टेल मध्ये राहणाऱ्या मुलींकडुन घेतलेला किराया, ले—आउट मध्ये राहणाऱ्या कुटूंबांकडुन मिळालेले मेंटेंनंस भाडे रक्कम व त्याचे ताब्यात असलेल्या गोडाउन मधील मौल्यवान बॉक्स व इतर साहीत्य असे एकुण ५०,०००/—रु. ची अफरातफर केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे भगवान महल्ले याचे विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता. आरोपीस त्याचेविरुध्द दाखल गुन्हयाची खबर लागली तेव्हापासुन आरोपी नेरी मानकर गाव सोडून पळून गेला होता.

नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर यांनी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक, यांचे नेतृत्वात फरार/पाहीजे आरोपी शोध मोहीम कामी विशेष पथके तयार केले. या माहिमेदरम्यान दि. १७/०३/२०२२ रोजी पोलीसांना खात्रीशिर बातमी मिळाली की, मागील ०७ वर्षापासुन पाहीजे असलेला आरोपी भगवान रमेश महल्ले रा. नेरी मानकर हा समर्थ नगर, मुरमाडी, लाखनी जि. भंडारा येथे राहत आहे. विशेष पथकाने मुरमाडी, लाखनी जि. भंडारा येथे जावुन आरोपीचा शोध घेतला व पाहीजे आरोपी भगवान रमेश महल्ले, वय ४४ वर्ष, रा. नेरी मानकर ह.मु. व्दारा श्री. यशवंत गि—हेपुंजे, समर्थ नगर, मुरमाडी, लाखनी जि. भंडारा ह्यास ताब्यात घेतले. आरोपीस पुढील कार्यवाही कामी पो. स्टे. कळमेश्वर यांचे ताब्यात दिले आहे.

. सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पो.हवा. निलेश बर्वे, दिनेश आधापुरे व चालक स.फौ. साहेबराव बहाळे यांनी केली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.**

## कळमेश्वर पोलीसांची अवैध दारू विक्री करणा—यांवर धडक कारवाई, मौजा गोंडखैरी बरड येथील दारू भट्टीवर छापे एकुण ११ लाखाचा मुद्देमाल जप्त.

होळीच्या सणाचे पार्श्वभुमीवर कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील गोंडखैरी येथील पारधी बरड येथे मोठ्या प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून तिची मोठ्या प्रमाणावर आजुबाजुचे परीसरात विक्री होणार असल्याची गोपनीय माहीती माहीती कळमेश्वर पोलिसांना मिळाल्याने दिनांक १७/०३/२२ रोजी पहाटे ०५/०० वा चे सुमारासस पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी पारडी बरड येथे सुरू असलेल्या अवैध दारू भट्टीवर छापे मारून एकुण ११,४०,६००/— रू चा माल जप्त करून आरोपीतांवर पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हे दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई दरम्यान खालीलप्रमाणे माल जप्त करण्यात आला आहे.

१. कच्चा रसायन सडवा १९००० लिटर, ४५० लिटर तयार मोहाफुल दारू

२. दारूभट्टी साठी लागणारे एकुण १०४ड्रम, घमेले साहीत्य

असा माल जप्त करून गावठी दारूच्या भट्टया उध्वस्त करण्यात आल्या आहे. कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत २४ तासामध्ये १८ आरोपीविरूध्द दारूबंदी कायदाअन्वयें गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री आसिफराजा शेख, सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, सपोनि मेश्राम, पोलीस उपनिरीक्षक बुदे, पोउपनि मुंडे, सहायक फौजदार मन्नान नौरंगाबादे, राजेंद्र पाली, पोलीस हवालदार प्रकाश उईके, कामडी, पोलीस नाईक रवी मेश्राम, श्रीकांत बोरकर, पोलिस शिपाई राणा ठाकुर, प्रदीप सरोदे, तसेच स्थानीक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण येथील सहायक पोलीस निरीक्षक श्री कर्मलवार, अनिल राउत, व ईतर कर्मचारी यांनी पार पाडली.

सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.

## कोळसा चोरी करणा—या आरोपीतांवर कारवाई एकुण १,१३,९५०/— रु चा माल जप्त

**पोलीस स्टेशन कन्हान :—** यातील इंदर डंपिग चिरादेव शिवार १७ किमी पश्चिम, कन्हान दि १६/३/२२ चे ०१/०० ते ०२/०० वा. दर. फिर्यादी यांचे गार्ड इंदर डंपिग चिरादेव शिवार पेट्रोलिंग डयुटी करीत असताना यातील आरोपी क्र **१). बंडु कश्यप २.) फारूख अब्दुला शेख रा कन्हान ३) अभिषेक उर्फ चिन्टु सिंग रा खदान न ०६ कन्हान** हे फिर्यादी व स्टॉफ यांना पाहुन पळुन गेले व सदर ठिकाणी जमिनीवर पडलेला कोळशाचे वजन **एकुण २२ टन कोळसा एकुण किमती १,१३,९५०/— रु चा माल जप्त केला.** व कोल डिपो मध्ये जमा करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे इसांत बंडुजी शेन्डे वय ३८ वर्ष रा गोडेगाव कॉलोनी कन्हान यांचे रिपोर्टवरून पो स्टे कन्हान येथे आरोपीविरूध्द कलम ३७९,३४, भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मोहन शेळके मो.नं. ९०४९१३६९१९ करीत आहेत.

## मोटर सायकल अपघात दोन्ही मोटर सायकल चालकाचा मृत्यु

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** यातील मौजा अंतर्गत करंभाड शिवार सावनेर ते पारशिवनी रोडवर ०२ कि.मी. पश्चिम यातील आरोपी क्र. १) प्रकाश उर्फ गोलु सुरेश सावरकर वय २८ वर्ष रा. पारशिवनी याने आपली मोटर सायकल करंभाड कडुन पारशिवनी कडे भरधाव व निष्काळजीपणे चालवित येत असता व आरोपी क्र.२) कमलाकर नथ्थुजी मेंघर वय ६० वर्ष रा. पारशिवनी हे आपली मोटर सायकल पारशिवनी कडुन त्यांचे शेताकडे निष्काळजीपणे रोड क्रॉस करीत असता दोन्ही मोटर सायकल चा अपघात झाल्याने दोन्ही मोटर सायकल. चालक अपघातात जखमी होवुन स्वताच्या मरणास कारणीभुत झाले.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे पोलीस उपनिरीक्षक पळनाटे पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो स्टे पारशिवनी येथे मोटर सायकल चालकाविरूध्द कलम कलम २७९, ३०४(अ) भादवी, सहकलम १८४ मो.वाका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि. नागुलवार सा. पो.स्टे. पारशिवनी मो.क्र.९९२३३७२६४७ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**